महाराष्ट्र शासन

क्र. एनजीसी ३५९९/नमवि/(२२६/९९)/मशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ मार्च, २०००.

प्रति,
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन विधी महाविद्यालयं सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे क्रमांक संलग्नता/टी-२/नवीन कॉलेज/१६०४५, दिनांक २८.१२.१९९९ चे पत्र.

महोदय,

सन २००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यासंदर्भात आपल्या विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन भारती विद्यापीठ, पुणे या संस्थेस कराड, जि. सातारा येथे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२(५) च्या परंतुकानुसार (१) कराड, जि. सातारा या ठिकाणी सत्र न्यायालय कार्यरत आहे व (२) स्थानिक परिसरात विधी अभ्यासक्रमाची गरज आहे, या बाबी विचारात घेऊन सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून विधी महाविद्यालय सुरु करण्यास पुढील अटींच्या अधीन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

१) संस्थेने बार कौन्सिल ऑफ इंडिया यांची मान्यता घेतल्याखेरिज विधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. तसेच, बार कौन्सिल ऑफ इंडियाने विहित केलेल्या अटी व तरतुदींचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२) संस्थेने विद्यापीठास दाखल केलेल्या मूळ प्रस्तावामध्ये जो अभ्यासक्रम सुरु करण्याची मागणी केली आहे, तोच अभ्यासक्रम सुरु करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) शासन निर्णय, क्रमांक बीयुसी-१०८८/(२०२९)/मशि-३, दिनांक १० जानेवारी, १९९६ च्या तरतुदीनुसार विहित अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन यथावकाश सदर महाविद्यालयास टप्प्याटप्प्याने अनुदान मंजूर करण्याबाबत विचार करण्यात येईल.

४) सदर महाविद्यालयास विद्यार्थी संख्येबाबत शासन निर्णय क्रमांक बैठक/१०९६/विधी महा./(५३९/९६)/मशि-३, दिनांक २८.४.१९९७ मधील तरतुदी पूर्ण करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(कृपया मागे पहा.)

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

आपला विश्वासू,

(म. अ. सरपोतदार)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर.
अध्यक्ष/सचिव, भारती विद्यापीठ, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे-३०.
खाजगी सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
खाजगी सचिव, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
स्वीय सहाय्यक, अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती/मशि-३.

Kadam
प्रभारी प्राचार्य
भारती विद्यापीठाचे
यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय, कराड.